# मुंबई विद्यापीठ

क्र.वि.नि.वि.वि/५०६/८/२०१४

**परिपत्रक :—**

विषय :— मुंबई विद्यापीठातर्फे महाविद्यालयीन स्तरावर गुणवंत शिक्षकेतर कर्मचा—यांची शिफारस करणेबाबत.

महोदय/महोदया,

सर्व संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य यांना कळविण्यात येते की, मुंबई विद्यापीठातर्फे महाविद्यालयीन स्तरावर सन २०१४—१५ करिता गुणवंत शिक्षकेत्तर कर्मचा—यांचा विद्यापीठातर्फे, विद्यापीठाने निर्धारित केलेल्या निकषाच्या आधारावर निवड करून, तसेच विद्यापीठातर्फे निवड होणा—या गुणवंत शिक्षकेत्तर कर्मचा—यांना प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात येईल.

या परिपत्रकाद्वारे आपणांस असे कळविण्यात येते की, महाविद्यालयाच्या सेवेत नाविण्यपूर्ण, कौशल्यपूर्ण आणि आदर्शवत काम केलेले आहे अशा शिक्षकेत्तर कर्मचा—यांचा यथोचित सत्कार २६ जानेवारी २०१५ रोजी प्रजासत्ताक दिनी करण्याचे ठरविले आहे.

आपणांस अशी विनंती करण्यात येते की, ज्या महाविद्यालयीन शासनमान्य व अनुदानित व विनाअनुदानित संलग्नित महाविद्यालयातील ज्यांची किमान **<u>२० वर्षे सेवा</u>** झालेली आहे, ज्यांनी विशेष गुणवत्ता व अर्हता धारण केली आहे अशा एक किंवा दोन पात्र शिक्षकेत्तर कर्मचा—यांचे प्रस्ताव विद्यापीठाला **<u>३ प्रतित दि. २६ जुलै २०१४ पर्यंत</u>** पाठवावेत.

तसेच ज्या शिक्षकेत्तर कर्मचारी यांची शिफारस करावयाची, त्यांची माहिती सोबत जोडलेल्या अर्जामध्ये नेमणूकीच्या पत्राची प्रत, तसेच अन्य सर्व कागदपत्रांच्या सत्य प्रती तसेच पोलिस अहवाल, **<u>सहप्रस्तावासोबत ३ प्रतित</u>** पाठविणे आवश्यक आहे. (तसेच संबंधित कर्मचा—यांची १० ते १५ ओळीत संक्षिप्त माहिती/त्यांचा दुरध्वनी क्रमांक/महाविद्यालयांचा दुरध्वनी क्रमांक व घरचा पूर्ण पत्ता) स्वतंत्र पानावर लिहून जोडण्यात यावा.

प्राचार्य (डॉ.) राजपाल श्री. हांडे
(संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ)
मुंबई विद्यापीठ

मुंबई — ४०० ०३२
१ जूलै २०१४

प्रति :—
प्राचार्य, सर्व संलग्नित अनुदानित व विनाअनुदानित तसेच शासनमान्य कला, वाणिज्य, विज्ञान, विधि, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी औषधनिर्माणशास्त्र व वास्तुशास्त्र महाविद्यालये. (उपरोक्त संदर्भातील परिपत्रक व जोडपत्र विद्यापीठाचे संकेत स्थळ <u>www.mu.ac.in</u> वर उपलब्ध आहे.)

मुंबई विद्यापीठ

सन् २०१४–१५ करिता गुणवंत पुरस्कार, आपल्या महाविद्यालयातील शिफारस करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांची खालील प्रमाणे सविस्तर माहिती दिनांक २६ जुलै, २०१४ पर्यंत सहाय्यक कुलसचिव विद्याविषयक नियोजन आणि विकास विभागाकडे सादर करावी.

अनु. क्र.

१. कर्मचाऱ्यांचे संपुर्ण नाव: श्री./श्रीमती ..................................................................
सेवा पुस्तिका क्रमांक..........................................कर्मचारी संकेतांक क्र. : ............

२. महाविद्यालयातील कायमस्वरुपी तत्वावरील नियुक्तीचा दिनांक :.................................
वेगवेगळया पदांच्या कामांचा कालावधी:– ..............................................................

३. सेवेतील कालावधी .................................. वर्षे :...............................

४. सध्याचा हुद्दा : ........................................................................................................

५. कार्यालयीन उपस्थिती नियमित व वक्तशिरपणा तसेच रजा संपवण्याचा कल याबाबत सविस्तर टिपणी सादर करावी. : ..................................

६. वर्तणुक : – सौजन्यशिल व नम्रता आणि कामाची अडचण सोडविण्याच्या दृष्टीने उचललेली पाऊले, विद्यार्थी, पालक व शिक्षक यांना सहाय्य करणेबाबत.

७. कार्यालयीन कामकाजातील वक्तशीरपणा :– परिणामकारक कार्यक्षमता, कार्यतत्परता, तसेच महाविद्यालयीन, विद्यापीठ, तसेच शासकीय कार्यालयाशी विशेष सहभाग व महाविद्यालयीन परिक्षांमध्ये विशेष सहभाग, उत्साहाने जबाबदारी तसेच आज्ञाधारक, नेतृत्त्व पुढाकार व इतर कर्मचारी यांच्याबद्दल असलेले संबंध समुहात काम करण्याची आवड, काळजीपूर्वक काम करण्याची आवड याबाबत सविस्तर टिपण्णी सादर करावी.

८. शिस्तभंगाची कारवाई अथवा ज्ञापन देण्यात आले आहे का? होय/नाही
असल्यास त्याबाबतची माहिती : ..............................................................................

९. शैक्षणिक अर्हता, गुणवत्ता वाढविण्याचे प्रयत्न, सेवेत असताना मिळविलेल्या पदव्या व पदविका, कार्यशाळा शिबिरे यामध्ये सहभाग, संगणक कौशल्य :– (कृपया जुजबी, पारंगत, उत्कृष्ठ, उत्तम विशेष नैपुण्य चा उल्लेख करावा.)याबाबत सविस्तर टिपण्णी सादर करावी

१० पोलीस अहवाल : ..........................................................................................

११ सेवेत असताना यापूर्वी पारितोषिक/बक्षिस प्राप्त झाले आहे का? होय/नाही
असल्यास सविस्तर माहिती तसेच प्रती देण्यात यावी : ................................................

१२ प्राचार्य यांची शिफारस : ........................................................................

महाविद्यालय सेवेत नाविन्यपूर्ण, : ........................................................................

कौशल्यपुर्ण आणि आदर्शवत ........................................................................
केलेल्या कामाची सविस्तर माहिती देणे. ..............................................................

प्राचार्य
(महाविद्यालयाचा शिक्का)

.......................................